नि.दि.दावा क्र.२२३/२००६.
शालन यादव वगैरे विरुध्द
वसंत पाटील वगैरे

## निशाणी क्र.१०३ कडील आदेश

प्रतिवादी क्र.५ ने सदरच्या अर्जाद्वारे तिचेविरुध्द झालेला विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

२. अर्ज वाचला. अर्जातील कथनांप्रमाणे, प्रस्तुत दावा प्रतिवादीने कैफियत देणेवर आहे. परंतु प्रतिवादी ही खेडयातील राहणारी असून तिला कोर्टाच्या कामकाजाची माहिती नाही. तसेच प्रतिवादीचे पती व मुलगा हे आजारपणात मयत झालेमुळे तिचे जीवनात नैराश्य आलेने तिला बरेच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागले. त्यामुळे सदर प्रतिवादीस मुदतीत कैफियत देता आली नाही. सबब तिचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्याचा हुकुम झालेला आहे. वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याच्या दृष्टीने व उभय पक्षातील वाद विषय कायमस्वरुपी संपुष्टात येणेसाठी या प्रतिवादीची कैफियत दाखल करुन घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने हरकत घेतली असुन अर्ज खोटा असुन वादीला मान्य नाही. वादीला त्रास देणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजुर करावयाचा असल्यास जास्तीत जास्त खर्च बसविण्याची मागणी केली आहे.

४. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

५. प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात उभय पक्षांचे मौलिक अधिकार समाविष्ट आहेत. दाव्यामध्ये तांत्रिक अडचण राहु नये म्हणुन व या प्रतिवादीस त्याचा योग्य तो बचाव मांडता यावा याकरिता पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. परंतु त्याने मुदतीत कैफियत दाखल केली नाही, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. दाव्याचा गुणावगुणांवर निर्णय होण्याकरिता या प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. तथापि कैफियत दाखल करण्यास या प्रतिवादीकडुन झालेला उशिर विचारात घेऊन त्याचेवर योग्य तो खर्च बसविणे न्यायोचित होईल.

६.		उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु झालेला विलंब पाहता, प्रतिवादी क्र.५ वर रक्कम रु.७००/— इतका खर्च बसविणे न्यायोचित होईल. सबब मी पुढील आदेश पारीत करित आहे.

**: <u>आदेश</u> :**

१.	अर्ज (नि.१०३) रु.७००/ इतक्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२.	खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.५ ने वादीस पुढील तारखेपर्यंत देण्याची आहे.

३.	सदर आदेशाद्वारे नि.१ कडे प्रतिवादी क्र.५ विरूध्द झालेला विना कैफियतचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

दिनांक— ०१.०१.२०१८
कराड

(आरती कुलकर्णी)
५ वे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड